# फळसेवाडी हितकारी संस्था
## विशेष सर्वसाधारण सभा

**दिनांक** : रविवार 02 नोव्हेंबर 2003
**स्थळ** : शिरोडकर हायस्कुल, परेल

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री साबाजी त्रिंबक राणे | 9. श्री दिलीप मधुकर राणे |
| 2. श्री मधुकर संभाजी राणे | 10. श्री मनोहर भिकाजी राणे |
| 3. श्री उदय भगवान राणे | 11. श्री अशोक दत्ताराम राणे |
| 4. श्री सुनिल सदानंद राणे | 12. श्री विनोद विठोबा राणे |
| 5. श्री मंगेश सावंत | 13. श्री सत्यवान गणपत सावंत |
| 6. श्री अविनाश बाळकृष्ण राणे | 14. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 7. श्री मधुसुदन श्रीधर राणे | 15. श्री आनंद नारायण साटम |
| 8. श्री अविनाश कृष्णाजी राणे | |

उपरोक्त संस्थेची विशेष सभा शिरोडकर हायस्कूल परेल, मुंबई – 400 012 येथे रविवार दिनांक 02 नोव्हेंबर 2003 रोजी घेण्यात आली. अध्यक्ष श्री रामकृष्ण भगवान राणे हे अनुपस्थित असल्यामुळे सर्वाच्या सहमतीने सभेच्या अध्यक्षस्थानी श्री मनोहर भिकाजी राणे यांची निवड करण्यात आली. त्यानंतर चिटणीसांनी मागील इतिवृत्त विशेष सभा दिनांक 15 डिसेंबर 2002 चे वाचन केले. त्यानुसार त्या इतिवृत्तावर चर्चा होऊन ते इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

त्यानंतर चिटणीसांनी सभाग्रहास अशी माहीती दिली की श्री साबाजी त्रिंबक राणे यांच्या कुटूंबियांव्यतिरिक्त कोणीही वर्गणी दिलेली नाही. तसेच संस्थेस कायम स्वरुपी पत्ता नसल्यामुळे वर्गणी पुस्तके छापता येत नाहीत व वर्गणी पावती देता येत नाही. तरी त्या दृष्टीकोनातून कायम स्वरुपी उपाय करावा लागेल.

या गोष्टीस अनुसरून श्री मनोहर भिकाजी राणे यांची एप्रिल 2004 पर्यंत अध्यक्ष व श्री मधुकर संभाजी राणे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्या दृष्टीने श्री मधुकर संभाजी राणे यांच्या पत्यावर पावती पुस्तके छापून मागील 2003 पर्यंत वर्गणी घेण्याचे ठरले व कालावधीसाठी आजन्म सभासदत्वासाठी विचार करावा असे ठरले. तसेच यापुढे रितसर मेंबरशिप फार्म भरुन घ्यावे असे ठरले.

चिटणीसांनी वाडीतील कामासंबधी माहीती दिली व डांबरीकरण लवकरच सुरू होईल सांगितले.
श्री आनंद नारायण साटम यांनी संस्थेच्या माहीतीसाठी फोटोग्राफी संबधी सुचना केली. या सभेत श्री साबाजी त्रिंबक राणे, श्री मधुसुदन श्रीधर राणे इत्यादि वरीष्ठ नागरीकांनी सहभाग दिला. ही सभा सायंकाळी 7:00 वाजता संपन्न झाली.

---

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-02-(36 to 38)